# वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त), सोलापूर

## सहाय्यक प्राध्यापक पदाच्या भरती परीक्षेसाठी

## मराठी विषयाचा व्यापक अभ्यासक्रम

---

### घटक १ : भाषा, भाषाविज्ञान आणि मराठी भाषा

मराठी भाषेचा उगम, विकास, स्वरूप व वैशिष्ट्ये; भाषेची विविध रूपे; प्रमाणभाषा व बोलीभाषा; ध्वनिविचार, शब्दविचार, रूपविचार, वाक्यविचार व अर्थविचार; भाषाविज्ञानाच्या प्रमुख संकल्पना; मराठी व्याकरण; भाषिक व्यवहार व भाषिक परिवर्तन.

### घटक २ : साहित्य, संस्कृती आणि समाज

साहित्य व संस्कृती यांचा परस्परसंबंध; साहित्यनिर्मितीची सामाजिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी; साहित्य आणि समाजजीवन; साहित्याचे प्रयोजन, स्वरूप व मूल्ये; भारतीय व मराठी सांस्कृतिक परंपरा; आधुनिकता, जागतिकीकरण आणि साहित्य.

### घटक ३ : भारतीय साहित्य, मराठी साहित्य आणि भाषांतर

भारतीय साहित्याची संकल्पना व वैशिष्ट्ये; भारतीय भाषांतील साहित्यपरंपरा; मराठी साहित्याचे भारतीयत्व; भाषांतराचे स्वरूप, सिद्धान्त व प्रक्रिया; भाषांतरातील समस्या व तंत्रे; साहित्यिक, सांस्कृतिक आणि सर्जनशील भाषांतर.

### घटक ४ : लोकसाहित्य आणि विशेष साहित्यप्रवाह

लोकसाहित्याचे स्वरूप, परंपरा व प्रकार; लोकगीत, लोककथा, लोकनाट्य, म्हणी, वाक्प्रचार व लोकविश्वास; दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य व अल्पसंख्याक साहित्य; सामाजिक वास्तव, अस्मिता आणि प्रतिकाराचे साहित्यिक स्वरूप.

### घटक ५ : मराठी वाङ्मयाचा इतिहास

मराठी साहित्याच्या ऐतिहासिक विकासाचे विविध टप्पे; आद्य, मध्ययुगीन, अर्वाचीन व आधुनिक साहित्य; प्रमुख साहित्यिक प्रवाह, लेखक, कवी व साहित्यकृती; साहित्यनिर्मितीची सामाजिक, राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी; मराठी वाङ्मयेतिहासाच्या अभ्यासाच्या पद्धती, भक्तिसंप्रदाय- भक्तिसंप्रदाय, संतपरंपरा आणि भक्तिसाहित्याचे तत्त्वज्ञान व योगदान.

## घटक ६ : मराठी साहित्यिक चळवळी

भक्ती, सुधारणा, राष्ट्रवाद, आधुनिकता, नवकविता, नवकथा, नवकादंबरी, दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी व प्रयोगशील साहित्यचळवळी; चळवळींची उद्दिष्टे, विचारधारा, वैशिष्ट्ये व साहित्यावरील परिणाम; साहित्य आणि सामाजिक परिवर्तन.

## घटक ७ : साहित्यप्रवाह आणि साहित्यविचार

वास्तववाद, आदर्शवाद, स्वच्छंदतावाद, आधुनिकतावाद, उत्तरआधुनिकतावाद, अस्तित्ववाद, मार्क्सवाद, स्त्रीवाद, दलितवाद व संरचनावाद; साहित्याच्या आशय, रूप, भाषा व शैलीचा अभ्यास; विविध साहित्यप्रवाहांचे स्वरूप, तत्त्वे व मराठी साहित्यावरील प्रभाव.

## घटक ८ : साहित्यशास्त्र आणि समीक्षा

साहित्याचे स्वरूप, प्रयोजन व मूल्य; रस, ध्वनी, अलंकार, रीती, वक्रोक्ती, औचित्य व शब्दशक्ती; भारतीय व पाश्चात्त्य साहित्यशास्त्र; साहित्यसमीक्षेचे स्वरूप, प्रकार व पद्धती;

## घटक ९ : साहित्यप्रकारांचा अभ्यास

कविता, कथा, कादंबरी, नाटक, एकांकिका, ललितगद्य, निबंध, आत्मचरित्र, चरित्र, प्रवासवर्णन, वैचारिक लेखन, समीक्षा व इतर गद्यप्रकार; साहित्यप्रकारांची संकल्पना, रचना, आशय, शैली, तंत्र व विकास; विविध साहित्यप्रकारांचे तुलनात्मक व चिकित्सक अध्ययन.

## घटक १० : निवडक साहित्यकृतींचा अभ्यास

अभ्यासक्रमात निर्धारित केलेल्या निवडक कविता, कथा, कादंबऱ्या, नाटके, निबंध, आत्मचरित्रे, चरित्रे व इतर साहित्यकृतींचा सखोल अभ्यास; आशय, रचना, व्यक्तिरेखा, भाषा, शैली, प्रतिमा, प्रतीके, सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ व साहित्यिक मूल्ये; साहित्यकृतींचे चिकित्सक, तुलनात्मक व समीक्षात्मक विश्लेषण.